Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 200

## Cotemporary Problems in India and Remidies

**Guest Editor :**
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

**Associate Editors -**
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 101 | ग्रामीण महिला सक्षमीकरणात डॉ. एम. एस. स्वामीनाथन् यांचे योगदान | डॉ. कैलास ठोंबरे व डॉ.राजाभाऊ गायकवाड | 416 |
| 102 | वाढता दहशतवाद आणि भारत | डॉ. केशव लहाने | 422 |
| 103 | जागतिक तापमान वाढ व भारताची राष्ट्रीय सुरक्षा | डॉ. किरण चक्रे | 427 |
| 104 | पर्यावरण प्रदूषण व उपाय | डॉ. राखी सलगर | 434 |
| 105 | शाश्वत विकास आणि भारतीय सद्यस्थिती | डॉ. रमेश वाघमारे | 438 |
| 106 | दहशतवाद : एक गंभीर समस्या | डॉ. साहेब राठोड | 442 |
| 107 | भारतासमोरील आव्हाने : विशेष संदर्भ दारिद्र्य | डॉ. सिद्धेश्वर सटाले | 445 |
| 108 | दहशतवादाचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. डी.एस.शिंदे | 448 |
| 109 | बेकारी : एक राष्ट्रीय समस्या | डॉ. शिवाजी चौगुले | 452 |
| 110 | समकालीन भारतीय अर्थकारण : समस्या आणि उपाययोजना | डॉ. शिवराज पाटील | 457 |
| 111 | दहशतवाद आणि समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुनिल जाधव | 460 |
| 112 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाय | डॉ. सुरेश सामाले | 463 |
| 113 | दारिद्र्य : देशाच्या विकासापुढील एक समस्या | डॉ. टी.आर.फिसफिसे | 468 |
| 114 | सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद | डॉ. सुनिता टेंगसे व गोपाळ गांगुर्डे | 473 |
| 115 | भारतातील दारिद्र्याची कारणे व उपाययोजना | गौरव पाटील | 479 |
| 116 | मानवी जीवनावर होणारे पर्यावरण प्रदूषणाचे दुष्परिणाम | डॉ. संदीपान गायके | 484 |
| 117 | भारतीय राजकारण आणि धर्म | डॉ. जे.एस.ढवळे | 487 |
| 118 | भारतातील सायबर गुन्हे : एक अवलोकन | डॉ. जयसिंग सिंगल | 489 |
| 119 | दारिद्र्याचे समाजशास्त्रीय अध्ययन : एक अभ्यास | दलित कांबळे व डॉ. दिपक धारवाडकर | 498 |
| 120 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाययोजना | प्रा. नंदकुमार कुकलारे | 502 |
| 121 | नक्षलवाद : एक समाजशास्त्रीय आकलन | मीना राजपूत व डॉ. जी.एच.बानायत | 508 |
| 122 | कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ. जयदेव मोहिते | 513 |
| 123 | आदिवासी इतिहासलेखनातील डॉ. जिरेवाड सर यांचे योगदान | नितीन क्षीरसागर | 516 |
| 124 | इस्लामी व्याजपद्धती - अर्थशास्त्रीय अभ्यास | डॉ. सय्यद मुसा | 519 |
| 125 | भ्रष्टाचार- एक गंभीर समस्या | डॉ. अनंत नरवडे | 522 |
| 126 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य सामाजवादातील आर्थिक विचार | प्रा. वितेश निकते | 527 |
| 127 | भ्रष्टाचार आणि क्रीडा स्पर्धा | प्रा. भारत पल्लेवाड | 530 |
| 128 | पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज | डॉ. किरण पिनाटे | 533 |
| 129 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय | प्रा. आर.एस.पोपळघट | 536 |
| 130 | भारतातील भ्रष्टाचाराची समस्या | प्रा. प्रकाश काळवणे | 541 |
| 131 | सायबर गुन्हेगारी एक सामाजिक समस्या | प्रा. एच.आर.खेत्री | 545 |
| 132 | बालगुन्हेगारी समस्या : समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. आर.बी.काळे व प्रा.जी.टी.मोकासरे | 548 |
| 133 | दहशदवाद : समकालीन प्रश्न आणि उपाय | डॉ. आर.के.काळे | 552 |
| 134 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील समस्यांचे चित्रण | प्रा. संदिप परदेशी | 559 |
| 135 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या समस्या व उपाय | प्रा. इंदू साळुंके | 563 |
| 136 | रत्नागिरी जिल्ह्याचे उत्पन्न आणि दारिद्र्याचे स्वरूप | प्रा.एल.एस.सिताफुले | 568 |
| 137 | स्त्री शिक्षण समस्या व उपाय | प्रा. सीताराम मोगल, भागवत गोरे | 575 |
| 138 | भ्रष्टाचाराचे ग्रामीण समाजावर झालेली परिणाम - एक समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ मुदखेड तालुका, जिल्हा नांदेड) | डॉ. दत्ता तंगवलवाड | 579 |


Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# सायबर गुन्हेगारीतून निर्माण होणारा दहशतवाद

**प्रा. डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
सहयोगी प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ,
जि. परभणी

**गांगर्डे गोपाळ मदन**
सहा.प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
विवेकांनद महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावना :**

वर्तमान काळात एकीकडे इंटरनेटचा वापर वाढत चाललेला असतानाच दुसरीकडे इंटरनेटशी संबंधीत असलेल्या अनेक गुन्ह्यांच्या बातम्या आपल्याला वृत्तपत्रांमधून सातत्याने वाचायला मिळतात. संगणकावरील दस्तऐवज चोरी, व्हायरसच्या माध्यमातून धोका पोहोचवणे, बदनामीकारक मजकूर प्रसारित करणे, वैयक्तिक मर्यादांचा भंग करणे, ऑनलाईन फसवणूक इत्यादी प्रकारची सायबर गुन्हेगारी फोफावली आहे. तसेच अनेक जणांनी बँक खाती हॅक होऊन त्यातून पैसे गायब होतात. अनेक व्यक्तीच्या डेबिट कार्डचे तपशील चोरीला जातात. किंवा क्रेडीट कार्डचा गैरवापर करुन एखादा भामटा इंटरनेटवर खरेदी करतो. तसेच ऑनलाईन व्यवहार करतांना एखादा आकडा चुकल्यास त्याचे लाखो रुपयांचे नुकसान होते. तसेच लॉटरी लागल्याचे आमिष दाखवून सोशल मीडियाद्वारे एखाद्याला लुबाडले जाते. फेसबुक किंवा इतर सोशल नेटवर्किंग साईटवर कुणाचीतरी बदनामी करण्यात येते. अनेक बनावट प्रोफाईल तयार करुन तरुणींना त्रास दिला जातो.

RESEARCH JOURNEY

| अ. क्र. | राज्य | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्र प्रदेश | २८२ | ५३६ | ६१६ |
| २ | अरुणाचल प्रदेश | १८ | ६ | ४ |
| ३ | आसाम | ३७९ | ४८३ | ६९६ |
| ४ | बिहार | १७४ | २४२ | ३०९ |
| ५ | छत्तीसगड | १२३ | १०३ | ९० |
| ६ | गोवा | ६२ | १७ | ३१ |
| ७ | गुजरात | २२७ | २४२ | ३६२ |
| ८ | हरियाना | १५१ | २२४ | ४०१ |
| ९ | हिमाचल प्रदेश | ३८ | ५० | ३१ |
| १० | जम्मु-काश्मीर | ३७ | ३४ | २८ |
| ११ | झारखंड | ९३ | १८० | २५९ |
| १२ | कर्नाटक | १०२० | १४४७ | ११०१ |
| १३ | केरळ | ४५० | २९० | २८३ |
| १४ | मध्य प्रदेश | २८९ | २३१ | २५८ |
| १५ | महाराष्ट्र | १८७९ | २१९५ | २३८० |

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

इंटरनेटवर टायपिंग किंवा डाटा एन्ट्री करण्याचं काम घरबसल्या करुन देण्याच आमिष दाखवून काही जणांना फसवलं जातं. एखाद्या व्यक्तीचं ई-मेल खातं हॅक करुन त्यामधली गोपनीय माहिती चोरली जाते. अशा असंख्य घटनांची माहिती आपल्याला वृत्तपत्रांत वाचायला मिळते. अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो २०१६ च्या रिपोर्टनुसार सन २०१४ मध्ये ९६२२ सायबर गुन्हे नोंदविले गेले होते. तर २०१५ मध्ये ११५९२ आणि २०१६ मध्ये १२३१७ सायबर गुन्हे नोंदविले गेले. देशातील एकूण सायबर गुन्ह्यांचा आलेख पाहिला तर तो दिवसेंदिवस चढतच असलेला आपल्याला पाहायला मिळेल.[१] (नॅशनल क्राईम रेकार्ट ब्यूरो : २०१६:४१७) एन.सी.आर.बी.च्या २०११ आणि २०१५ या वर्षातील सायबर गुन्हेगारी आकडेवारीचा विचार केल्यास महाराष्ट्राची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. देशात मागील दोन वर्षामध्ये सर्वाधिक सायबर गुन्ह्यांची नोंद महाराष्ट्रात झाली. या संदर्भात सुहास जोशी लोकप्रभा मध्ये लिहितात, गेल्या तीन वर्षातील सायबर गुन्ह्यांची आकडेवारी पाहता त्यामध्ये वाढच झालेली दिसून येते. मार्च २०१८ मध्ये ४,०३५ गुन्ह्यांची नोंद झाली होती. तर ताज्या आकडेवारीनुसार २०१८ च्या पहिल्या दहा महिन्यांतच (जानेवारी ते ऑक्टोबर) ३२३३ गुन्हे नोंदविले गेले आहेत.[२] (जोशी : लोकप्रभा ८ फेब्रुवारी २०१९ :१३)

**तालिका क्र. ५.१ भारतातील सायबर गुन्हेगारी**

आधार - क्राईम इन इंडिया २०१६: ४१७[३]

वरील तालिकेवरुन असे स्पष्ट होते की सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात देशात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. तसेच नॉटर्म - २०१३ या अहवालात म्हटले आहे की, भारतात ऑगस्ट २०१२ ते जुलै २०१३ या एका वर्षाच्या काळात सायबर गुन्ह्यांचा फटका बसलेल्यांची संख्या १९२ वरुन २०७ झाली आहे. या अहवालानुसार सायबर गुन्ह्यांमुळे ऑगस्ट २०१२ ते जुलै २०१३ या काळात भारताला २४६३० कोटी रुपयांचा फटका बसला आहे.[४] (सकाळ : ६ जानेवारी २०१५) तसेच सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून अनेक सामाजिक चिंतेच्या घटना घडत आहेत. व्यसनाधीनता, प्रेमाच्या, अवास्तव कल्पना, वैफल्य आणि आत्महत्या, वेळेचा अपव्यय, निरर्थक सवयी त्यामुळे कमी होणारी कार्यप्रवणता अशी अनेक संकटे समाजात वारंवार येताना दिसत आहेत. इंटरनेट माध्यम जवळजवळ सर्वांनाच आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याची अगदी सहज संधी देत असल्याचे आपल्या आयुष्यात घडलेली प्रत्येक गोष्ट समाज माध्यमवर शेअर केली जाते. मग कुठल्याही फोटोवर, पोस्टवर कुणी काहीच बोललं नाही, किंवा प्रतिक्रिया दिली नाही की कुणी आपल्याला किंमत देत नाही ही भावना मनात घर करते. त्यातून 'फिअर ऑफ रिजेक्शन' अधिकाधिक बळावत जाते व त्यातून नैराश्य येते.

**सायबर गुन्हेगारी :**

वर्तमान युगात इंटरनेट या माध्यमांचा आपण दैनंदिन व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापर करतो. या माध्यमाने भौतिक सीमा नसलेले आभासी जग निर्माण केले आहे. आज हे माध्यम सर्वसामान्यांच्या घराघरांत तर पोहचले पण स्मार्ट फोनद्वारे ते सामान्य माणसाच्या खिशात सामाविले आहे. फक्त बोटाच्या साहाय्याने आपण आभासी जगात प्रवेश करु शकतो. ज्यांच्याजवळ स्मार्ट फोन किंवा संगणक, इंटरनेट आहे असा कुणीही आभासी दुनियेत प्रवेश करु शकतो. इथे प्रवेश करण्यासाठी व्हिसा किंवा लाखो रुपयेही खर्च करावे लागत नाहीत. इंटरनेट सेवा देणाऱ्या मोबाईल कंपन्यांमुळे तर आजकाल ते फारच सोपं झालयं. या आभासी जगात हवसे-गवसे-नवसे असे सर्वच प्रकारचे लोक असतात. इथे येणाऱ्यांचे प्रत्येकांचे काही ना काही उद्दिष्ट असते. मागील काही वर्षात भारतामध्ये इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या झ पाट्याने वाढली आहे. केबल, ब्रॉड बँड, वायफाय, वायरलेस, डाटा कार्ड आणि स्मार्टफोनमुळे आपण जगात कोठेही, कोणाशीही संपर्कात राहू शकतो. वास्तविक हा विज्ञान व तंत्रज्ञानाचा चमत्कारच म्हणावा लागेल. परंतु हे तंत्रज्ञान काही लोकांसाठी वरदान ठरण्यापेक्षा शाप ठरु लागले आहे. गेल्या काही वर्षापासून आपण ऑनलाईन, ऑफलाईन,

वेबआवृत्त्या, समाज माध्यम, व्हर्च्युअल वर्ल्ड, व्हायरल, सायबर गुन्हेगारी, सायबर सुरक्षा कायदा असे शब्द आजकाल ऐकायला मिळत आहेत. वरील सर्व शब्द इंटरनेटशी संबंधीत आहेत. त्यातीलच 'सायबर गुन्हेगारी' हा एक शब्द होय.

सायबर गुन्हेगारी म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात सांगायचे झाल्यास, इंटरनेट या माध्यमांच्या गैरवापरालाच सायबर गुन्हेगारी असे म्हणतात. इंटरनेटसह संगणक, मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साधनांचा आणि टेलिकम्युनिकेशन नेटवर्कचा गैरवापर करुन एखाद्या व्यक्ती किंवा समूहाला शारीरिक अथवा मानसिक हानी पोहचविण्यासाठी किंवा त्यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने केलेले कृत्य म्हणजे सायबर गुन्हा होय. अशा प्रकारे क्रेडिट कार्डाचा पिन, ई-मेलचा पासवर्ड अशा प्रकारची वैयक्तिक आणि अतिसंवेदनशील माहिती चोरी करुन अथवा परस्पर त्याचा गैरवापर करुन गैरफायदा घेतात. अशा गैरफायदा घेणारी मंडळी साबर गुन्हे करतात. तसेच एस.एम.एस. किंवा ई-मेलद्वारे लॉटरी लागल्याचे किंवा नोकरी मिळाल्याचे फसवे आमिष दाखवून त्याद्वारे संबंधित व्यक्तीची माहिती संकलित करुन ऑनलाईन दरोडा घातला जातो.

तसेच जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबद्दल जाणीवपूर्वक बदनामीकारक, अपमानकारक, लांछनास्पद, हानिकारक मजकूर संगणक व इतर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्रसिद्ध करते व दुसऱ्या व्यक्तीला त्यापासून हानी पोहचवते तेव्हा त्यास सायबर गुन्हे असे म्हणतात. कोणताही इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेसेज एखाद्याची गैरसोय करण्यासाठी वा फसविण्यासाठी किंवा भ्रम निर्माण करण्यासाठी जेव्हा केला जातो तेव्हा त्यास सायबर गुन्हेगारी असे म्हणतात. सायबर गुन्ह्याचे उद्दिष्ट हे दुसऱ्या व्यक्तीचे समाजातील नाव, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेला नुकसान पोहचवणे हे असते. सामाजिक आणि आर्थिक बाबी, परस्परांवरील विश्वास आणि प्रतिष्ठा या गोष्टीवर अवलंबून असतात. बदनामीकारक माहिती म्हणजे एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेबाबत चुकीची माहिती पसरविणे होय. कोणतीही माहिती जी आक्षेपार्ह किंवा चारित्र्यावर कलंक लावणारी खोटी असून फक्त गैरसोय, अडवणूक, अपमान, हानी पोहचवणे, गुन्हेगारी, दहशत निर्माण करणारी दुश्मनी, तिरस्कार, आकस करणे या हेतूने संगणक किंवा कम्युनिकेशन साधनांचा वापर करुन पसरविणे होय.

RESEARCHJOURNEY

**समाज माध्यमे आणि दहशतवाद :**

ऑगस्ट २०१७ स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ मासिकात समाज माध्यमे आणि दहशतवाद या विषयावर विस्तृत लेखन केले आहे. ते खाली जसेच्या तसे देण्यात आले आहे. जगभरातील विविध देशांनी बंदी घातलेल्या ६४ दहशतवादी संघटनांपैकी ४१ संघटना फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटचा वापर खुलेआम करत आहेत.

**संशोधन पध्दती :**

संशोधन पध्दती ही संशोधन विषयावर अवलंबून असते. संशोधन विषयाप्रमाणे संशोधनाची पध्दत बदलत असते. ज्या विषयात किंवा विषयाच्या अनुषंगाने फारसे संशोधन झालेले नाही, अशा विषयाच्या अभ्यासासाठी प्रश्नावली, मुलाखत अशा शास्त्रीय संशोधन तंत्राचा उपयोग करावा लागतो.

कार्ल पीयर्सनच्या मते, सत्याकडे जाण्यास समीपचा मार्ग नसतो. सर्व तथ्य ही शास्त्रीय कसोटीवर तपासून घ्यावी लागतात.[४]

गुड आणि हॉट यांच्यामते, "संशोधन पध्दतीवर भर ही बाब समाजशास्त्रासारख्या नव्या ज्ञान शाखेच्या निरोगी वाढीचे सुचिन्ह्य होय."[५] यावरुन असे स्पष्ट होते की, अनुभव व ज्ञानाच्या आधारे येणाऱ्या अनुभवाची रचना व्यवस्थितपणे व सुसज्जपणे करण्याचा प्रयत्न कोणत्याही संशोधकाचा असतो. या संशोधनासाठी चुकीची तथ्य संकलीत केली तर त्य आधारावून काढलेले निष्कर्ष हे देखील चुकीचे ठरण्याची शक्यता असते. श्रीमती पॉलीन यंग यांच्या मते, "तथ्य हा शब्द वैज्ञानिक लिखानात वारंवार वापरला जातो. तरी अजुन या शब्दाची व्याख्या करणे अतिशय कठीण आहे."[१४]

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. प्रसार माध्यमे आणि सायबर कायदा संमजून घेणे.
२. सामाजिक प्रसार माध्यमातून होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा आढावा घेणे.
३. समाज परिवर्तनाचे साधन म्हणून सामाजिक प्रसार माध्यमांचा दूरगामी परिणाम स्पष्ट करणे.

**संशोधनाची गृहितके :**

अभ्यासाची सुरुवात निरीक्षणाने होत असली तरी, संकलीत केलेल्या माहीतीचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. संकलीत केलेल्या माहीतीचे वर्गीकरण केल्यानंतर, गृहितकृत्याची पार्श्वभुमी तयार होत असते. कारण येथे संशोधन मिळविलेल्या माहीतीचा आधार घेतांना मनाशी काही अंदाज बांधत असतो. या अंदाजालाच शास्त्रीय भाषेत गृहितकृत्ये म्हणतात.

**अहले सुन्नत वल जमात (एएसडब्लूजे)** ही संघटना दहशतवादी विचारसरणीचा आणि साहित्याचा विस्तार करण्यात फेसबुकवर कार्यान्वित असणारी सर्वात मोठी संघटना आहे. या संघटनेची २०० पेजेस आणि ग्रुप आहेत.
**झीसे सिंध मुत्ताहिदा महाज (जेएसएमएम)** या संघटनेची फेसबुकवर १६० पेजेस आहेत.
**सिपह-ए-सहाबा** संघटनेची १४८ पेजेस आहेत.
**बलुचिस्तान स्टुडंटस ऑर्गनायझेशन आजाद** या संघटनेने फेसबुकवर ५४ पेजेस बनवलेली आहेत.
**सिपह-ए-मोहम्मद** ची ५४ पेजेस आहेत.
**लष्कर-ए-झांगवी (एलईझेड).**
**तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान.**
**तहरीक-ए-तालिबान स्वात.**
**तहरीक-ए-निफज-ए-शरियत-मोहम्मदी.**
**जमात-उल-अहरार, ३१३ ब्रिगेड.**
**शया संघटना आणि बलुचिस्तानमधील फुटीरतावादी संघटना.**
**तालिबान - पाकिस्तान.** (स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ : ऑगस्ट २०१७)

या संघटनांच्या फेसबुक खात्यांना आणि पेजवरील फुटीरतावादी आणि कट्टरपंथी विचारधारेला खुलेआम मिळणारे समर्थन ही चिंतेची बाब आहे. हत्यारांचा वापर आणि प्रशिक्षण यांच्याशी संबंधित असणाऱ्या काही समूहांनी यापैकी काही फेसबुक खात्यांना सार्वजनिक पातळीवर लाईक केलेले आहे. जगभरातील प्रगत देशांसह आशियातील डोकेदुखी ठरलेली इस्लामिक स्टेट संघटना यामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या निर्बंध घातलेल्या संघटनांचे एक लक्ष्य जम्मू काश्मीर आहे. कारण बहुसंख्य पेजेसवर काही काळापूर्वी मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचे उदात्तीकरण केले जाते.

ज्या दहशतवादी संघटना समाज माध्यमांमध्ये सक्रिय आहेत. त्यांचा मुख्य उद्देश हा तरूणांच्या विचारधारेत परिवर्तन करुन, त्यांची माथी भडकावून त्यांना आपल्या विचारधारेत सामावून घेणे असा असतो. या संघटना इंग्रजीऐवजी उर्दू किंवा रोमन उर्दू भाषातून आपले फेसबुक पेज किंवा समूह चालवतात. या संघटनांचे लक्ष्य स्थानिक समर्थक मिळवणे आहे. दहशतवादी संघटनांकडून समाज माध्यमांवर राजकीय भाषणे, व्हिडिओ, ऑडिओ इत्यादी गोष्टी शेअर केल्या जातात. ट्वीटर, वेबसाईट, ब्लॉग आदी खात्यांची माहिती त्यात दिली जाते.

या पार्श्वभूमीवर भारताने अत्यंत सतर्क राहण्याची गरज आहे. आजच्या काळात युध्दनीती बदलत आहे. पूर्वीच्या काही केवळ सीमांवर लक्ष ठेवून राहून देशाचे संरक्षण करता येत असे. तसेच त्याचवेळी शत्रू हा एकच किंवा प्रत्यक्ष दृष्टिपथात येणारा असायचा.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

इंटरनेटचा गैरवापर करण्यात या दहशतवादी संघटना आघाडीवर आहेत. पाकिस्तान सुरूवातीपासूनच दहशतवाद्यांचा संरक्षक राहिला आहे. दहशतवादाच्या रोपट्याला खतपाणी घालून मोठे करण्यात या देशाचा सर्वात मोठा हातभार आहे. आता या सायबर दहशतवादालाही पाकिस्तान मदत करतो आहे. 'आयसिस' सारख्या संघटनांनी केलेले हल्ले असोत किंवा भारतात कारवाया करण्याचे फसलेले कट असोत यासाठीच्या नियोजनामध्ये समाज माध्यमांचा हातभार राहिला आहे. त्यामुळे समाज माध्यमांना आपली विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी काही कठोर उपाय योजने आवश्यक आहे. त्याबरोबर अशा संघटनांची खाती ज्या देशातून चालवली जातात, त्या देशालाही याबाबत प्रश्न विचारण्याची व त्याच्यावर कारवाईबाबत दबाव आणण्याची गरज आहे.

फेसबुक, मायक्रोसॉफ्ट, गुगल, व्हॉट्सॲप, स्कायमी या समाज माध्यमांतील बहुतांश कंपन्या अमेरिकन आहेत. अलीकडील काळात अशा पद्धतीच्या आक्षेपार्ह व विचार भडकवणाऱ्या किंवा दहशतवादी कारवायांचे नियोजन करणाऱ्या काही पोस्ट सोशल साईट्सवर केल्या तर त्या हेरून डिलीट केल्या जातात. त्यासाठी विशिष्ट सॉफ्टवेअर तयार केली गेली आहेत. त्यामुळे समाज माध्यमांमध्ये या संघटनांवर आता बंधने येऊ लागली आहेत. म्हणून या संघटनांनी २०१३ नंतर टेलिग्रामचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. टेलिग्रामचा मोठा फायदा म्हणजे तुम्ही स्वतःची ओळख लपवू शकता. तसेच टेलिग्राममध्ये मेसेजेस ब्लॉक करणे देखील अवघड आहे. त्यामुळेच अलीकडच्या काळामध्ये इस्लामिक स्टेटसारखी संघटना ही टेलिग्रामचा मोठ्या प्रमाणात वापर करते आहे. 'आयसिस' सारख्या दहशतवादी संघटनांचे लक्ष्य युरोप असले तरी तेथील मुस्लिमांपर्यंत समाज माध्यमांपर्यंत आपला संदेश, विचारसरणी पोहचवण्यासाठी, या माध्यमांचे कार्य हाताळण्यासाठी त्यांना तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पारंगत असणाऱ्या सुशिक्षित मुस्लिमांची गरज आहे. त्यासाठी ज्या देशामध्ये सुशिक्षित मुस्लिम लोकसंख्या अधिक आहे, अशा देशांकडे या संघटनांचे विशेष लक्ष असल्याचे दिसते. दुर्दैवाने, यामध्ये भारताचाही समावेश आहे.

**संदर्भसूची :**

1. Crime in India 2016 Statistics National Crime Records Bureau Ministry of Home Affairs, Government of India, New Delhi -110037, 2016, P. no. 32.
२. जोशी सुहास 'सायबर गुन्ह्यात वाढ आरोपी मोकाट', साप्ताहीक लोकप्रभा, जानेवारी २०१९, संपादक विनय परब, पृ. क्र. १३.
3. Crime in India 2016 Statistics National Crime Records Bureau Ministry of Home Affairs, Government of India, New Delhi -110037, P. no. 417.
४. दैनिक सकाळ, दिनांक ६ जानेवारी २०१५, मंगळवार, पृ. क्र. ९.
५. सिंह गोविंद, खबरों पर झूठ का साया, मूल्यानुगत मीडिया, मासिक नवंबर, २०१७.
६. बेलसरे चैतन्य, 'मनी म्युल आर्थिक व्यवहारांमधील एजंटस', 'दक्षता' दिवाळी अंक संपादक - रश्मी करंदीकर, ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४, मुंबई, पृ. क्र. ६०.
७. कहाते अतुल, (२०१५), 'इंटरनेट वापरातील धोके टाळण्यासाठी', रोहन प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. ६४.
८. राठी तृप्ती, 'सायबर गुन्हेगारी', संपादक - सुमती लांडे, प्रसार माध्यमे विशेषांक - शब्दालय दिवाळी २०१५, अंक -२६, पृ. क्र. १६०.
९. लोकराज्य मासिक, जून २०१७.
१०. ॲड. माळी प्रशांत, 'सोशल मीडियावर बदनामी' लोकराज्य, संपादक -सुरेश वांदिले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, सप्टेंबर २०१६, पृ. क्र. २३.

११.लोकराज्य, एप्रिल २०१७.
१२. आऊटलुक मासिक, नोव्हेंबर २०१६.
१३. स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ, ऑगस्ट २०१७.
१४.सिंह अजित, सूचनाओ की रफ्तार, आउटलुक, १७ जुलै २०१७, पृ. क्र. ४.
१५.दैनिक लोकमत, दिनांक १२ नोव्हेंबर २०१४.
१६. डॉ. जयराज पी. के. मुथुराई इअरबुक प्लस २०१७, पृ. क्र. ७३०.
१७.स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ, सप्टेंबर २०१७.
१८. दैनिक लोकसत्ता, दिनांक ३० ऑक्टोबर २०१७.
१९. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दिनांक १५ मार्च २०१७.
२०.महाराष्ट्र टाइम्स, दिनांक ५ फेब्रुवारी २०१७.
२१. लोकप्रभा १ सप्टेंबर २०१७, पृ. क्र. १५.
२२.परब विनायक, डिजिटल धक्का, लोकप्रभा साप्ताहिक, संपादक - विनायक परब, १ सप्टेंबर २०१७, पृ. क्र. १६.
२३.दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दिनांक ६ ऑगस्ट २०१७.
२४. दैनिक लोकसत्ता, दिनांक ३० ऑक्टोबर २०१५.
२५.प्रा. रेड्डी उर्मिला गोविंद, डिजिटल इंडिया सुशासनाचा उत्तम मार्ग, यशदा यशमंथन, जुलै - सप्टेंबर २०१६, पृ. क्र. १०.
26. www.worldometers.info भेट दिनांक २५ ऑगस्ट 2017.
27. https://economictimes.indiatimes.com 20 जून 2018)
28. UNCTADC (united nations conference on trade & Development) Report 2016.
२९. शास्त्री धर्मेंद्र (२०१५) 'टेलिविजन प्रसारण की तकनिकी' प्रक्रिया, तेज प्रकाशन, नई दिल्ली - ११०००२, पहिला संस्करण २०१५, पृ. क्र. १३४.
३०.यशाची परिक्रमा, ऑगस्ट २०१७, पृ. क्र. ३३.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani